*The BGE Society's*

**Shri. R. L. T. College of Science, Akola**

# Blood Donation Camp

## 24 December 2018

Blood donation camp was organized on 24 th December 2018 to mark the death anniversary of late principal M. G. Joshi. Blood donation is one of the most significant contributions that a person can make towards the society as it is not harmful to the adult person to donate the blood. The body of the donor person regenerates the blood it poses no threat to the metabolism of body main objective of organizing this blood donation camp was,

1. To encourage all people to strengthen the emergency preparedness of health services in their community by donating blood.
2. To build wider public awareness of the need for committed, year-round blood donation, in order to maintain adequate supplies and achieve a national self-sufficiency of blood.
3. To encourage young people to become new donors as well.

Blood donation camp was organized by Disaster Management Club in collaboration with NSS, NCC and Sports department of college. The camp was inaugurated by the hands of Principal Dr. V. D. Nanoty with gracious presence of Dr. U. K. Bhalekar Head department of Microbiology, Shri R.L.T. College of Science, Akola and Blood collecting Unit of Hedgewar Blood Bank, Akola. Total 37 persons donated blood (2 Girls, 4 faculty members and 31 Volunteers). Dr. Samadhan Mundhe, Dr. Rashmi Joshi, Dr. R. D. Chandrawanshi contributed and given their positive support and help in organizing the blood donation camp.



दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

## श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

(संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित)

### स्व. प्राचार्य म.गो. जोशी स्मृतिदिन

**(रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर, पारितोषिक वितरण, माजी विद्यार्थी मेळावा २०१८)**

महोदय/महोदया,



स्व. प्राचार्य म.गो. जोशी

**रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर**

सोमवार, दि. २४ डिसेंबर २०१८ वेळ : सकाळी ९ ते १२

**सौजन्य :**
- डॉ. हेडगेवार रक्तपेढी, अकोला
- सुक्ष्मजीवशास्त्र विभाग
- राष्ट्रीय सेवा योजना

**विनित**

**डॉ. विजय नानोटी**
प्राचार्य
श्री रा.ल.तो. विज्ञान महा., अकोला

**डॉ. राजेन्द्र रहाटगांवकर**
**डॉ. पूनम अग्रवाल**
IQAC

**श्री. किशोर शेगोकार**
शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी

**रक्तदान शिबीर व रक्तगट तपासणी समिती**

| | |
|---|---|
| डॉ. एस.आर. कोहचाळे | डॉ. आर.डी. चंद्रवंशी |
| डॉ. एच.एस. मालपाणी | प्रा. पी.पी. गेडाम |
| डॉ. आर.एम. अग्रवाल | डॉ. एस.एल. मुंडे |
| डॉ. कु. पी.आर. जोशी | श्री. के.वाय. पाटील |

## प्रयोगशाळा उद्‌घाटन, गुणगौरव सोहळा, पारितोषिक वितरण, माजी विद्यार्थी मेळावा

सोमवार, दि. २४ डिसेंबर २०१८ वेळ : दुपारी १२ वा.

| | |
|---|---|
| उद्‌घाटक : | **मा.आमदार श्री. रणधीरजी सावरकर**<br>**मा.आमदार श्री. विप्लवजी बाजोरीया** |
| कार्यक्रमाचे अध्यक्ष : | **मा.डॉ. आर.बी. हेडा** (अध्यक्ष, बी.जी.ई. सोसायटी, अकोला) |
| विशेष उपस्थिती : | **श्रीमती मालतीताई जोशी**, अकोला<br>**मा.श्री. वसंतजी खंडेलवाल** |
| प्रमुख उपस्थिती : | **मा.श्री. विजयकुमारजी तोष्णीवाल**, वरिष्ठ उपाध्यक्ष<br>**मा.डॉ. रविंद्रजी जैन**, कनिष्ठ उपाध्यक्ष<br>**मा.ॲड. मोतीसिंहजी मोहता**, मानद् सचिव<br>**मा.श्री. शरदजी चवरे**, सहसचिव |

आणि समस्त कार्यकारिणी सदस्य, दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला

**पारितोषिक वितरण समिती**

| | |
|---|---|
| डॉ. आर.डी. चंद्रवंशी | डॉ. ए.जी. सरप |
| डॉ. ए.एस. सावरकर | प्रा. आर.डी. चौधरी |
| प्रा. एस.व्ही. मडावी | प्रा. एस.सी. झायटे |
| श्री. डी.जे. वानखडे | श्री. व्ही.एस. अळणे |

**माजी विद्यार्थी समिती**

| | |
|---|---|
| प्रा. आर.डी. चौधरी | प्रा.आर.बी. घायळकर |
| डॉ.कु. पी.आर. जोशी | डॉ. पी.टी. अग्रवाल |

व समस्त श्री रा.ल.तो. परिवार






उपक्रम • स्व. प्राचार्य जोशी स्मृती समारोहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

# रा. ल. तो. कॉलेजमध्ये गुणगौरव सोहळा,माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

प्रतिनिधी । अकोला

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात २४ डिसेंबरला स्व. प्राचार्य म. गो. जोशी यांच्या स्मृती समारोहानिमित्त विविध कार्यक्रम पार पडले. त्यामध्ये प्रयोगशाळेचे उद्घाटन, गुणगौरव सोहळा, माजी विद्यार्थी मेळावा, रक्तदान, रक्तगट तपासणी व पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आमदार रणधीर सावरकर, आ. विप्लव बाजोरिया होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. बी. हेडा, प्रमुख उपस्थितीत मानद सचिव ॲड. मोतीसिंह मोहता, सहसचिव शरद चवरे होते. या वेळी बी.जी.ई. कार्यकारिणी सदस्य अनिलकुमार तापडिया, पवन माहेश्वरी, प्रा. व्ही. टी. हजारे, डॉ. सत्यनारायण बाहेती, प्रा. श्रीकृष्ण अमरावतीकर प्राचार्य डॉ. विजय नानोटी, कार्यक्रमाचे समन्वयक आर. डी. चंद्रवंशी, दि बी.जी.ई. संस्था शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी पंकज



रालतो महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना आमदार सावरकर. या वेळी व्यासपीठावर उपस्थित असलेले मान्यवर.

अग्रवाल आदी उपस्थित होते. या वेळी स्व. प्राचार्य म. गो. जोशी यांच्या प्रतिमेला हारार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. भौतिकशास्त्र प्रयोगशाळेचे उद्घाटन आमदार रणधीर सावरकर व सूक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळेचे उद्घाटन आमदार विप्लव बाजोरिया यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांनी केले. या वेळी आमदार रणधीर सावरकर यांनी दि बी.जी.ई. संस्था ही विद्यार्थी हितासाठी झटत असल्याबद्दल गौरवोद्गार काढले. तंत्रज्ञानाने प्रगती केली तरी फळा, खडू, गुरुजी याला पर्याय नाही, असे सांगितले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आय.ए.एस, आय.पी. एस. तत्सम परीक्षांमध्ये आपला सहभाग वाढवल्यास पुरोगामी महाराष्ट्र निर्माण करता येईल अशी अपेक्षा व्यक्त केली. तर आमदार विप्लव बाजोरिया यांनी रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय हे विदर्भातील सर्वात चांगले महाविद्यालय असून, सामाजिक जाणीव ठेवून अग्रेसर होत असलेले महाविद्यालय असल्याचे सांगितले. मनोगत व्यक्त करताना ॲड. मोतीसिंह मोहता यांनी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी संस्था पावले उचलत आहे, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी बी.जी.ई.एस. सायन्स अकॅडमीसारखे उपक्रमही सुरू असल्याचीही माहिती दिली. यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. हेडा यांनी स्व. प्राचार्य म. गो. जोशी सर्वधर्मसमभावाने वागले असे सांगितले. डॉ. हेडगेवार रक्तपेढी, राष्ट्रीय सेवा योजना तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या सौजन्याने रक्तगट तपासणी, रक्तदान शिबिर घेण्यात आले. यामध्ये ३० मुले, २ मुली, ५ महाविद्यालयीन कर्मचारी अशा ३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर महाविद्यालयातील १२५ विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना सावलकर यांनी तर आभार प्रदर्शन समन्वयक डॉ. राजेश चंद्रवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या डॉ. पूनम अग्रवाल, डॉ. राजेंद्र रहाटगावकर प्रा. डॉ. कोडचाळे, डॉ. राजेश चंद्रवंशी, डॉ. एच.एस. मालपाणी, प्रा. पी.पी. गेडाम, डॉ. आर.एम. अग्रवाल, डॉ. एस.एल. मुंडे, डॉ. रश्मी जोशी, डॉ. ए.जी. सरप, डॉ. सावरकर, प्रा. आर.डी. चौधरी, प्रा. सांगोळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

देशोन्नती

मंगळवार, दि. २५ डिसेंबर २०१८
epaper.deshonnati.com

# फळा, खडू आणि गुरुजींना पर्याय नाही- आ. सावरकर

## ■ प्राचार्य 'एमजी' स्मृती दिन विविध उपक्रमांनी साजरा
## ■ प्रयोगशाळा उदघाटन, गुणगौरव सोहळा, माजी विद्यार्थी मेळावा

प्रतिनिधी/२४ डिसेंबर

**अकोला:** विज्ञानाने कितीही अत्याधुनिक प्रगती केली असली तरी फळा,खडू आणिस गुरूजींना पर्याय नाही,असे प्रतिपादन आ.रणधीर सावरकर यांनी केले. तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी 'आयएएस' , आयपीएस आणि तत्सम परीक्षांमध्ये आपला सहभाग वाढविल्यास पुरोगामी महाराष्ट्र निर्माण करता येईल असा आशावाद वक्त केला.

बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य 'एमजी' जोशी यांच्या स्मृति कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी प्रयोगशाळा उद्‌घाटन, गुणगौरव सोहळा, माजी विद्यार्थी मेळावा, रक्तदान, रक्तगट तपासणी व स्मृति पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला उद्‌घाटक म्हणून आरएलटीचे माजी विद्यार्थी आमदार रणधीर सावरकर, आ. विप्लव



बाजोरीया होते. कार्यक्रमाच्या संस्थेचे अध्यक्ष डॉ.आर.बी. हेडा होते. यावेळी व्यासपीठावर मानद सचिव ॲड. मोतीसिंह मोहता, सहसचिव शरद चवरे कार्यकारिणी सदस्य अनिल तापडीया, पवन माहेश्वरी, प्रा.व्ही.टी. हजारे, डॉ.सत्यनारायण बाहेती, प्रा.श्रीकृष्ण अमरावतीकर, आरएलटीचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी, कार्यक्रमाचे समन्वयक आर.डी. चंद्रवंशरी शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी पंकज अग्रवाल आदी उपस्थित होते.

यावेळी ॲड. मोतीसिंह मोहता यांनी स्पर्धात्मक परीक्षा केंद्र सुरू करण्यासाठी संस्था पावले उचलत आहे, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी बी.जी.ई.एस. सायंन्स ॲकेडेमी सारखे उपक्रमही सुरू असल्याचीही माहिती दिली. या कार्यक्रमात रक्तगट तपासणी, रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये ३० मुले, २ मुली, ५ महाविद्यालयीन कर्मचारी अशा ३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर महाविद्यालयातील १२५ विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी षिबीराचा लाभ सुक्ष्मजीवषास्त्र विभागाचे प्रा.डॉ.उमेष भालेकर, डॉ.हरिश मालपाणी व त्यांची चमू यांचे मार्गदर्षनाखाली घेतला. कार्यक्रमाचे संचालन प्रा.अर्चना सावलकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.राजेश चंद्रवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.पुनम अग्रवाल, डॉ. राजेंद्र रहांटगांवकर, प्रा.डॉ.कोहचाळे, डॉ.राजेष चंद्रवंशी, डॉ.एच.एस. मालपाणी, प्रा.पी.पी. गेडाम, डॉ.आर.एम. अग्रवाल, डॉ.एस.एल. मुंडे, डॉ.रश्मी जोशी, डॉ.ए.जी.सरप, डॉ. सावरकर, प्रा.आर.डी. चैधरी, प्रा.एस.व्ही. मडावी, प्रा.एस.सी. झायटे, डी.जे.वानखडे, व्ही.एस. अळणे माजी विद्यार्थी समिती सदस्य प्रा.आर.डी. चौधरी, प्रा.आर.बी. घायाळकर यांच्यासह शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

आपलं अकोला

तरुण भारत

बुधवार, २६ डिसेंबर २०१८ १

# फळा, खडू आणि गुरूजी याला पर्याय नाही



## आमदार रणधीर सावरकर यांचे प्रतिपादन

## प्राचार्य म.गो.जोशी स्मृती समारोह संपन्न

## १२५ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी

**अकोला, २५ डिसेंबर**

आधुनिक युगात तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शिक्षणासाठी आणि ज्ञान मिळविण्यासाठी फळा, खडू आणि गुरूजी याला इतर कोणताही पर्याय नाही असे प्रतिपादन रालतो विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व आमदार रणधीर सावरकर यांनी महाविद्यालयातील एका कार्यक्रमात केले. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आय.ए.एस, आय.पी.एस. अशा स्पर्धा परीक्षांमध्ये आपला सहभाग वाढविल्यास पुरोगामी महाराष्ट्र निर्माण करता येईल अशी अपेक्षा सुद्धा आमदारांनी व्यक्त केली.

दि बेरार जनरल एज्युकेषन सोसायटी द्वारा संचालित श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात स्व.प्राचार्य म.गो.जोशी यांच्या स्मृति समारोहाचे आयोजन त्याचबरोबर प्रयोगशाळा उद्घाटन, गुणगौरव सोहळा, माजी विद्यार्थी मेळावा, रक्तदान, रक्तगट तपासणी व स्मृति पारितोषिके वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आमदार रणधीर सावरकर, आमदार विप्लव बाजोरिया होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. बी. हेडा, प्रमुख उपस्थितीत मानद सचिव ॲड. मोतीसिंह मोहता, सहसचिव शरद ढवरे लाभले होते. यावेळी व्यासपीठावर बी.जी.ई. कार्यकारिणी सदस्य अनिलकुमार तापडीया, पवन माहेश्वरी, प्रा.व्ही.टी. हजारे, प्रा. श्रीकृष्ण अमरावतीकर, प्राचार्य डॉ. विजय नानोटी आदी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य म.गो.जोशी यांच्या प्रतिमेला हारार्पण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. भौतिकशास्त्र प्रयोगशाळेचे उद्घाटन आमदार रणधीर सावरकर व सूक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळेचे उद्घाटन आमदार विप्लव बाजोरिया यांचे हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांनी केले. दि बी.जी.ई. संस्था ही विद्यार्थी हितासाठी प्रामाणिकपणे झटत असल्याबद्दल आमदार सावरकर यांनी गौरवोद्गार काढले.

आमदार विप्लव बाजोरिया या प्रसंगी म्हणाले की, रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय हे विदर्भातील सर्वात चांगले महाविद्यालय असून सामाजिक जाणीव ठेवून अग्रेसर होत असलेले महाविद्यालय आहे.

स्पर्धात्मक परीक्षाचे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी संस्था पावले उचलत आहे. गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी बी. जी. ई. एस. सायन्स ॲकेडेमी सारखे उपक्रमही सुरू असल्याची माहिती ॲड. मोतीसिंह मोहता यांनी दिली. यावेळी आय. क्यू. ए. सी. न्युज बुलेटीन व बायोडायव्हरसिटी कॅलेंडरचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देवून सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ.आर.बी. हेडा यांनी प्राचार्य म.गो.जोशी सर्वधर्मसमभावाने वागत असे सांगून त्यांनी युवापिढीस रक्तदानासाठी प्रेरणा दिली. डॉ. हेडगेवार रक्तपेढी, राष्ट्रीय सेवा योजना तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या सौजन्याने रक्तगट तपासणी, रक्तदान शिबिर घेण्यात आले. यामध्ये ३० मुले, २ मुली, ५ महाविद्यालयीन कर्मचारी अशा एकूण ३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर महाविद्यालयातील १२५ विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी शिबिराचा लाभ सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.उमेश भालेकर, डॉ.हरीश मालपाणी व त्यांची चमू यांचे मार्गदर्शनाखाली घेतला. या कार्यक्रमाचे संचालन प्रा.अर्चना सावलकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.राजेश चंद्रवंशी यांनी केले.

अकोला, बुधवार, 26 दिसंबर 2018

# पूर्व विद्यार्थी सम्मेलन व पुरस्कार वितरण समारोह



भास्कर न्यूज | अकोला

स्थानीय विज्ञान महाविद्यालय में स्व. प्राचार्य जोशी की स्मृति समारोह, प्रयोगशाला उद्घाटन, गुणगौरव समारोह, पूर्व विद्यार्थी सम्मेलन, रक्तदान, रक्तगुट जांच व स्मृति पुरस्कार वितरण कार्यक्रम हाल ही में संपन्न हुए। कार्यक्रम के उद्घाटक के रूप में रालतो महाविद्यालय के पूर्व विद्यार्थी विधायक विप्लव बाजोरिया, सावरकर आदि थे।

कार्यक्रम के अध्यक्ष स्थान पं दि बेरार जनरल एजूकेशन सोसाइटी के अध्यक्ष डा. आर. बी. हेडा, प्रमुख उपस्थिती में एड. मोतीसिंह मोहता, शरद चवरे तथा मंच पर अनिल तापडिया, पवन माहेश्वरी, प्रा. हजारे, डा. सत्यनारायण बाहेती, प्रा. श्रीकृष्ण अमरावतीकर, प्राचार्य डा. विजय नानोटी, चंद्रवंशी, पंकज अग्रवाल आदि उपस्थित थे। इस अवसर स्व. प्राचार्य जोशी की प्रतिमा को माल्यार्पण कर दीपप्रज्वलन से कार्यक्रम शुरू हुआ। प्रयोगशाला का उद्घाटन विधायक विप्लव बाजोरिया के हाथों किया गया। इस अवसर डा. हेडगेवार रक्तपेढी,

## शिविर में 37 रक्तदाताओं ने किया रक्तदान, 125 छात्रों की रक्तगुट जांच

राष्ट्रीय सेवा योजना तथा सूक्ष्म जीवशास्त्र विभाग की ओर से रक्तगुट जांच, रक्तदान शिविर लिया गया। जिसमें 37 रक्तदाताओं ने रक्तदान किया।

महाविद्यालय के 125 छात्रों ने रक्तगुट जांच शिविर का लाभ लिया। शिविर प्रा. डा. उमेश भालेकर, डा. हरिश मालपाणी व उनकी टीम के मार्गदर्शन में संपन्न हुआ। रक्तदान में रासेयो, एनसीसी, शा. शि. ।वेभाग, आपातकालीन व्यवस्थापन समिति के विद्यार्थियों ने सहभाग लिया था। कार्यक्रम का संचालन प्रा. अर्चना सावलकर ने तथा आभार प्रदर्शन चंद्रवंशी किया। कार्यक्रम की सफलता के लिए प्राचार्य नानोटी के मार्गदर्शन में डा. पूनम अग्रवाल, डा. राजेंद्र रहाटगावंकर, प्रा. डा. कोहचाले, गेडाम, मुंडे, डा. रश्मी जोशी, के. वाय. पाटिल आदि ने परिश्रम लिए। कार्यक्रम में प्राध्यापक, कर्मचारी, पूर्व प्राचार्य नाईकवाडे, डोणगांवकर, प्रा. तापी, संजीव घडयाल समेत छात्र उपस्थित थे।

**Coordinator** **Principal**

**Shri. R. L. T. College of Science, Akola**